## * आधारस्तंभ *

**सन्मा.डॉ.राजेंद्र एकनाथराव विखे पाटील**
अध्यक्ष,प्रवरा मेडिकल ट्रस्ट, लोणी
कुलपती, प्रवरा आरोग्य विज्ञान संस्था (अभिमत विद्यापीठ) लोणी
सदस्य,व्यवस्थापन परिषद सा.फु.पु.वि.पुणे

**सन्मा.सौ.सुवर्णाताई राजेंद्र विखे पाटील**
विश्वस्त, प्रवरा मेडिकल ट्रस्ट, लोणी

**सन्मा.सौ.मोनिकाताई स्वप्नील सावंत**
विश्वस्त, प्रवरा मेडिकल ट्रस्ट, लोणी
सहसचिव, प्रवरा मेडिकल ट्रस्ट शैक्षणिक संकुल, शेवगाव

**सन्मा.श्री.ध्रुव राजेंद्र विखे पाटील**
विश्वस्त, प्रवरा मेडिकल ट्रस्ट, लोणी

**सन्मा.श्री.पंजाबराव विश्वासराव आहेर पाटील**
कार्यकारी संचालक
प्रवरा मेडिकल ट्रस्ट शैक्षणिक संकुल, शेवगाव

## * संयोजन समिती *

| | |
|---|---|
| **प्रा.साजेद पटेल**<br>(समन्वयक-IQAC) | **प्रा.अजित भालसिंग**<br>(अध्यक्ष,संयोजन समिती)<br>9960706928 |
| प्रा.केशव ससे<br>7517846596 | डॉ.सुरेश नजन<br>9359189493 |
| प्रा.रामदास कातकडे<br>9021565377 | प्रा.चैतन्य गंगावणे<br>7020403462 |
| प्रा.पुजा मदने<br>8668423322 | प्रा.अश्विनी काटे<br>8308899849 |

Think Globally,Act Locally

## * आमची प्रेरणा *



कै.सहकार महर्षी डॉ.विठ्ठलराव विखे पाटील
(पद्मश्री उपाधीने सन्मानित)



कै.मा.खा.डॉ.बाळासाहेब विखे पाटील
(पद्मभूषण उपाधीने सन्मानित)



कै.माधवराव नारायणराव नरवडे पाटील

॥ ग्राम्यजनहितम् परम् ध्येयम् ॥
प्रवरा मेडिकल ट्रस्टचे

# आर्टस्,कॉमर्स अँण्ड सायन्स कॉलेज

शेवगाव,ता.शेवगाव जि.अहिल्यानगर
NAAC : CGPA 2.48 - 'B'

**कै.सिंधुताई एकनाथराव विखे पाटील**
**स्मृती राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा**

## निमंत्रण पत्रिका

दि.१२ जानेवारी २०२६

वर्ष तिसरे




* प्रेषक *

**डॉ.ओंकार रसाळ**
(प्राचार्य)

मा. प्राचार्य

सप्रेम नमस्कार वि.वि.

आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज शेवगावची मातृसंस्था प्रवरा मेडिकल ट्रस्ट ची स्थापना सन १९७२ मध्ये पद्मश्री डॉ.विठ्ठलराव विखे पाटील यांनी केली.दुष्काळग्रस्त व मागासलेल्या भागात राहणाऱ्या,लोकांसाठी दर्जेदार वैद्यकीय सेवा देणे हा संस्थेचा मुख्य उद्देश आहे. पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील यांच्या पश्चात माजी खासदार व पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित कै.डॉ.बाळासाहेब विखे पाटील यांनी यशस्वी धुरा सांभाळली. या उभयता नंतर डॉ.राजेंद्र विखे पाटील संस्थेची धुरा सांभाळत आहेत. या महाविद्यालयाची स्थापना सन २०१३-१४ मध्ये झाली. महाविद्यालय सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असून कला, वाणिज्य व विज्ञान आणि संगणकशास्त्र या विषयात पदवी अभ्यासक्रम व रसायनशास्त्रातील पदव्युत्तर अभ्यासक्रम शिकविला जातो.

## * 'बाई' महिला उत्थानाच्या दीपस्तंभ *

प्रवरा परिसरात वात्सल्यमुर्ती कै.सिंधुताई विखे या सामाजिक जीवनात बाई या नावाने सर्व परिचित होत्या. बाईंचा जन्म १ ऑगस्ट १९३५ रोजी झाला. बाईंनी आपल्या सामाजिक कार्याचा श्रीगणेशा सन १९८८ मध्ये प्रियदर्शनी ग्रामीण महिला मंडळाच्या संस्थापक अध्यक्षा म्हणून केला.या मंडळाने महिलांसाठी प्रियदर्शनी सार्वजनिक वाचनालय १९९०, प्रियदर्शनी महिला सहकारी पतसंस्था १९९२ रोजी स्थापन केली. महिलांना आर्थिकदृष्टया सक्षम करण्यासाठी महिला बचत गट,शिवणकला प्रशिक्षण वर्ग, या सारखे विविध उपक्रम हाती घेतले.

व यातूनच प्रवरा परिसरात स्त्रीसक्षमीकरणाची चळवळ गतिमान झाली. या चळवळीने प्रवरा परिसरातील महिलांना सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय क्षेत्रामध्ये उत्तुंग भरारी घेण्यासाठी सक्षम बनविले. कै.बाईंच्या कार्याचा गौरव म्हणून महाराष्ट्र शासन व इतर संस्थानी त्यांना विविध पुरस्काराने सन्मानित केले.

- * पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्कार -१९९७-९८ (महाराष्ट्र शासन)
- * मातोश्री रमाबाई आंबेडकर आदर्श महिला पुरस्कार -२००७
- * आदर्श गोपालक पुरस्कार -२००८ (जिल्हा परिषद अहमदनगर)
- * क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले पुरस्कार -२०१०-११ (उच्च व तंत्रशिक्षण विभाग महाराष्ट्र शासन)
- * सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा जीवन गौरव पुरस्कार

कै.बाईंच्या सामाजिक उत्थानाचा प्रेरणा स्त्रोत विद्यार्थ्यांसाठी सदैव प्रेरणादायी असावा म्हणून राष्ट्रमाता जिजाऊ माँ साहेब तसेच युगप्रवर्तक स्वामी विवेकानंद जयंतीचे औचित्य साधून कै.सिंधुताई एकनाथराव विखे पाटील स्मृती करंडक राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा आयोजित केली आहे.

## * स्पर्धा विषय:-

१) भारतातील प्रसार माध्यमांची ढासळती विश्वासार्हता.

२) उत्तम शेती कनिष्ठ का झाली?

३) संत साहित्य व अंधश्रद्धा निर्मुलन.

४) स्त्री स्वातंत्र्य : वास्तव की अभास.

५) सद्य आंतरराष्ट्रीय परिस्थिती आणि भारत.

## * पारितोषिके:

* प्रथम क्रमांक *

फिरता करंडक+ ५००० रु. + प्रमाणपत्र + ट्रॉफी (वैयक्तिक)

* व्दितीय क्रमांक *

३००० रु. + प्रमाणपत्र + ट्रॉफी(वैयक्तिक)

* तृतीय क्रमांक *

२००० रु. + प्रमाणपत्र + ट्रॉफी (वैयक्तिक)

* उत्तेजनार्थ (दोन) *

१००० रु. + प्रमाणपत्र + ट्रॉफी (वैयक्तिक)



सर्व सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्र देण्यात येईल.

* नोंदणी : अंतिम दिनांक: १० जानेवारी २०२६

## * स्पर्धेचे नियम:

१) स्पर्धा ही मराठी भाषेतच होईल.

२) प्रत्येक महाविद्यालयास स्पर्धेसाठी महाविद्यालयाचे दोन विद्यार्थी/विद्यार्थिनी पाठवता येईल. (वैयक्तिक)

३) स्पर्धेसाठी स्पर्धकाला ८+२ मिनिट वेळ देण्यात येईल.

४) स्पर्धेसंदर्भातील कोणताही निर्णय बदलण्याचा हक्क स्पर्धा आयोजकांकडे राहील.

५) निकालासंदर्भात परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील.

६) प्रत्येक स्पर्धकाने स्पर्धकाच्या नावाचा उल्लेख असलेले महाविद्यालयाच्या प्राचार्यांचे पत्र सोबत आणावे.

७) स्पर्धकाला प्रवास खर्च दिला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

८) प्रथम पारितोषिक विजेत्या स्पर्धकाला पुढील तीन वर्ष स्पर्धेत सहभागी होता येणार नाही.

९) स्पर्धेसाठी कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारले जाणार नाही.

* स्पर्धेच्या नोंदणीसाठी खालील क्यूआर (QR) कोडचा वापर करावा.